महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.** ३७४(२)/स्थापत्य/२०१९/१९ दिनांक - १३ एप्रिल, २०२२

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :-** महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ परीक्षेच्या अंतिम निकालाबाबत.

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ०५/२०१९, दिनांक ३ एप्रिल, २०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९, दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ तसेच आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १४ जुलै, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ ते २ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ करीता मुलाखती घेण्यात आलेल्या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण आठ संवर्गातील ११४५ पदांपैकी ११४३ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहेत.

२. प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालात एकूण ११४५ उमेदवारांपैकी अनाथांसाठी आरक्षित असलेल्या दोन पदांपैकी एक पद तसेच दिव्यांग श्रवण शक्तीतील दोष या प्रवर्गाकरीता आरक्षित असलेले एक पद पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त ठेवण्यात आले आहे.

३. सदर परीक्षेमध्ये **श्री. पाटील स्वप्नील सुनिल,** बैठक क्रमांक PN001230 हे राज्यातून सर्वसाधारण तसेच मागास प्रवर्गातून **प्रथम** आले आहेत व **श्रीमती फडतरे अनुजा प्रभाकर,** बैठक क्रमांक PN011067 या महिलांमधून राज्यात **प्रथम** आल्या आहेत.

४. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

५. सदर पदाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यावेळी समान गुण धारण करणाऱ्या गुणवत्ताधारक उमेदवारांबाबत आयोगाच्या कार्यनियमावलीतील सुधारणेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली होती. तथापि, अन्य एका परीक्षेच्या न्यायिक प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर जाहीरातीच्या दिनांकास वैध असलेल्या तरतूदीनुसार कार्यवाही अनुसरणे क्रमप्राप्त ठरत असल्याने आयोगाच्या कार्यनियमावलीतील परिच्छेद १० (७) मधील तरतूदीनुसार समान गुण धारकांचा प्राधान्यक्रम व गुणवत्ता क्रम निश्चित करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

७. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडू आरक्षणासाठी दावा केलेल्या उमेदवारांसंदर्भात शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ तसेच शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित राजपत्रित गट-अ व गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र तसेच पूर्व परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यांसदर्भातील उक्त दिनांकाची किंवा तत्पूर्वीची पोचपावती शासनास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी विषयांकित गट-अ / गट-ब पदांकरीता त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राचा संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल शासनास सादर करणे अनिवार्य राहील.

८. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण येथे दाखल झालेल्या मुळ अर्ज क्र. ३००/२०२२ तसेच मुळ अर्ज क्र. २८०/२०२२ प्रकरणी झालेले अंतरिम आदेश विचारात घेऊन व मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये विविध मुद्यांबाबत दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

९. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील “उमेदवारांना सर्वसाधारण सूचना” मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**